दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.१० मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १९३ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 10 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 193 • Pages 4 • Rate 4 Rs

## सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३०६ कोटींचा निधी

**मुंबई**–नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकारने तब्बल ३०६ कोटींचा निधी मंजूर केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज सोमवारी दिली. यावेळी त्यांनी नाशिकमधील रिंगरोड, मुख्य रस्त्यांची दुरुस्ती, भव्य वाहनतळ, भाविकांसाठी तात्पुरती निवारागृहे (साधुग्राम) आणि मिसिंग लिंक रोड यासारख्या प्रकल्पांना केंद्र सरकारकडून १०० टक्के अर्थसहाय्य मिळणार असल्याचेही सांगिले.छगन भुजबळ यांनी सांगितले की, नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६–२७ हा धार्मिक सोहळा नाशिकच्या सर्वांगीण विकासाची मोठी संधी आहे, हा दूरदृष्टिकोन ठेवून आपण केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. केंद्र सरकारच्या 'भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष अर्थसहाय्य योजने'अंतर्गत 'नाशिक कुंभमेळा २०२६–२७' साठी मी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी ३०६ कोटींच्या प्रकल्पांना केंद्र सरकारने निधी मंजूर केला आहे.

# नवीन ऑटो रिक्षा परवान्यांवर ब्रेक–सरकारचा मोठा निर्णय

## ट्रॅफिक जामवर लगाम,नवीन धोरण अंतिम झाल्यानंतरच पुन्हा परवाने

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात वाढत चाललेली वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषण या गंभीर समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यात आज म्हणजेच ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाने देण्याची प्रक्रिया तात्पुरती थांबवण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. मंत्रिमंडळाशी चर्चा करून आणि स्पष्ट कार्यपद्धती म्हणजेच एसओपी तयार केल्यानंतरच पुढे नवीन परवाने देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सध्या राज्यभरात नवीन ऑटो रिक्षा परवाने मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, राज्यातील अनेक मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होत असून ट्रॅफिक जामची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. विशेषतः मुंबई आणि उपनगरांमध्ये रिक्षांची संख्या प्रचंड वाढल्याने वाहतूक व्यवस्थापन अधिक कठीण झाले आहे. शहरांमधील रस्त्यांची क्षमता आणि वाहनांची वाढती संख्या यामध्ये मोठा तफावत निर्माण झाल्यामुळे काही काळासाठी नवीन परवाने देण्याची प्रक्रिया थांबवणे आवश्यक असल्याचे सरकारचे मत आहे.

या निर्णयाबाबत केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतररस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. मोटार वाहन (सुधारणा) कायदा २०१९) अंतर्गत राज्य सरकारला वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक अधिकार देण्यात आले आहेत. तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य सरकारला प्रवासी आणि मालवाहतुकीसंबंधी परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबवण्याचा अधिकार आहे. या अधिकारांचा वापर करून वाहतूक कोंडी कमी करणे, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारणे आणि शहरांमधील वाहतूक व्यवस्था नियंत्रित करणे शक्य असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.सरनाईक यांनी पुढे सांगितले की, सध्या राज्यभरात सुमारे १४ लाख ऑटो रिक्षा परवाने वितरित करण्यात आले आहेत. काही ठिकाणी एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांना रिक्षा परवाने देण्यात आल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये बांगलादेशी नागरिकांनाही अवैध पद्धतीने परवाने मिळाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करून परवाना प्रणाली अधिक पारदर्शक आणि नियंत्रित करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



### नवीन धोरण अंतिम झाल्यानंतरच पुन्हा परवाने

**राज्यातील पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारकडे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे शहरांमधील स्थानिक परिस्थिती, वाहतुकीच्या गरजा आणि नागरिकांची सोय लक्षात घेऊन नवीन धोरण तयार करण्यात येणार आहे. लवकरच स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे म्हणजेच एसओपी निश्चित करण्यात येईल. मंत्रिमंडळात चर्चा झाल्यानंतर आणि नवीन धोरण अंतिम झाल्यानंतरच राज्यात पुन्हा ऑटो रिक्षा परवाने देण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.**

# पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते महामंडळे पुढील अधिवेशनाच्या आत स्थापन करु-मंत्री ॲड आशिष शेलार यांची माहिती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारनेही जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही पुढीलप्रमाणे अधिवेशनाच्या आत करण्यात येईल, तसेच पत्रकारांच्या विविध विषयांवर पत्रकार संघटना, शासनातील विविध विभाग, संबंधित लोकप्रतिनिधी यांची एक व्यापक बैठक लवकरच घेण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री आशिष शेलार यांनी आज विधान परिषदेत दिली. आज विधान परिषदेमध्ये आमदार श्रीकांत भारतीय यांनी आज लक्षवेधी सूचना उपस्थित करून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. या लक्षवेधी मध्ये त्यांनी पत्रकार आणि वृत्तपत्र विद्यार्थ्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, कोरोना नंतर वृत्तपत्र क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणी, त्यातून निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने असलेल्या त्यांचे योजनेचे प्रस्ताव रखडणे, वर्तमानपत्र खरेदी करणारे वाचकांना आयकरात सूट देणे, पत्रकारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महामंडळातर्फे मदतीची आवश्यकता, गृहनिर्माण योजनेअंतर्गत पत्रकारांना घरे देणे, जाहिरातीवरील जीएसटी रद्द करणे, अशा विविध विषयांकडे लक्ष वेधले होते. आज मुख्यमंत्र्यांच्यावतीने उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, दोन्ही महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्री मंडळाने १० आक्टोबर २०२४ ला घेतला असून विविध खात्यांशी या विषयांचा समन्वय करायचा असल्याने ती प्रक्रिया



सुरु असून पुढील अधिवेशनाच्या आत याबाबत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन ही महामंडळे स्थापन करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.तसेच वर्तमानपत्रांचे आपल्या. लोकशाही प्रक्रियेत महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच चौथा स्तंभ म्हणून आपण स्थान दिले आहे. कोरोना काळात या क्षेत्रासमोर अनेक अडचणी निर्माण झाली तसेच काही नवीन आव्हाने सुध्दा उभी राहिली. त्यामुळे यातून मार्ग काढून या क्षेत्रातील अडचणी सोडवण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करते आहे तेही त्यांनी आपल्या उत्तरात विषद केले.

दरम्यान, या चर्चेत आमदार. सतेज पाटील आणि अन्य सदस्यांनी ही भाग घेऊन बाळशास्त्री जांभेकर पेन्शन योजने तील विलंब व काही अटी शर्तींबाबत प्रश्न उपस्थित केले. तर पत्रकार सुरक्षा कायदा या विषयाकडे लक्ष वेधले.

दरम्यान, हे विषय विविध खात्यांशी संबंधित असल्याने याबाबत एक सर्व विभागांची संयुक्त बैठक येत्या अधिवेशनाच्या आत घेण्यात येईल. त्यामध्ये या सगळ्या प्रश्नांवर चर्चा करु असे मंत्री शेलार यांनी आश्वस्त केले.

# महिलांना संघर्षाची ताकद देणाऱ्या रेणुका वराडे यांचा 'आदर्श महिला कार्यकर्ती' पुरस्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार २०२६ अंतर्गत सामाजिक कार्यकर्त्या रेणुका चेतन वराडे यांची आदर्श महिला कार्यकर्ती पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



रेणुका वराडे या समाजातील महिलांच्या प्रश्नांबाबत नेहमीच संवेदनशील राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. विशेषतः महिला बचत गटांना न्याय मिळवून देणे, त्यांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन करणे आणि महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत. महिलांवरील अन्याय, अडचणी आणि सामाजिक प्रश्नांवर त्या ठामपणे उभ्या राहत संघर्ष करण्याची भूमिका घेतात.महिलांना संकटाला सामोरे जाण्याची ताकद देणे, त्यांना पुढे येण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि समाजात महिला नेतृत्व निर्माण व्हावे यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे. त्यामुळेच त्यांच्या या समाजाभिमुख कार्याची दखल घेत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने त्यांची आदर्श महिला कार्यकर्ती पुरस्कारासाठी निवड केली आहे.हा पुरस्कार गुरुवार दि. १२ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंचायत समिती, आष्टी (जि. बीड) येथील सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल विविध स्तरातून रेणुका वराडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# बीडमधील रिक्षाचालकांचा वनवास थांबवा

## सी.एन.जी.पंपावर स्वतंत्र लाईनची मागणी–भागवत गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या महागाईमुळे डिझेल आणि पेट्रोलचे दर गगनाला भिडले आहेत. अशा परिस्थितीत सामान्य रिक्षाचालकांनी आपला उदरनिर्वाह करण्यासाठी सी. एन. जी.रिक्षांचा पर्याय निवडला आहे. मात्र, बीड जिल्ह्यातील सी.एन. जी. पंपांवर रिक्षाचालकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असल्याने त्यांच्या रोजगारावर संक्रांत आली आहे. या प्रश्नी शिवछत्रपती सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परमीट मालक चालक ऑटो रिक्षा संघटना जिल्हाध्यक्ष भागवत गायकवाड यांनी विभागीय आयुक्तांकडे पत्राद्वारे धाव घेऊन रिक्षाचालकांसाठी स्वतंत्र लाईन देण्याची मागणी केली आहे. तासनतास प्रतीक्षा: बीडमधील देवकते पेट्रोलियम (जालना रोड), भूषण पेट्रोलियम (चौसाळा) आणि झमझम पेट्रोलियम (गेवराई) या ठिकाणी सी.एन.जी. भरण्यासाठी मोठी गर्दी असते. एका रिक्षाला गॅस भरण्यासाठी किमान एक ते दोन तास



ताटकळत उभे राहावे लागते. अत्यावश्यक सेवेवर परिणामः रिक्षांमध्ये रुग्ण, शाळेतील मुले, महिला आणि वृद्ध नागरिक असतात. रिक्षा ही अत्यावश्यक सेवा असतानाही चालकांना इतर मोठ्या वाहनांच्या रांगेत उभे राहावे लागते, तसेच रिक्षा चालकांचा नंबर येई पर्यंत सी. एन. जी. संपलेली असते हे अन्यायकारक आहे. बीड जिल्हा वगळता इतर अनेक जिल्ह्यांमध्ये रिक्षाचालकांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था आहे. तशीच व्यवस्था बीडमध्येही लागू करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. रिक्षाचालक हा स्वतःच्या मेहनतीवरउदरनिर्वाह करतो. गॅससाठी दोन दोन तास रांगेत गेल्यामुळे त्यांचे दिवसाचे भाडे बुडते आणि आर्थिक नुकसान होते. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन स्वतंत्र लाईनचे आदेश द्यावेत. या संदर्भात यापूर्वी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना १२ सप्टेंबर २०२५ रोजी पत्र देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने आता थेट विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दाद मागण्यात आली आहे. प्रशासनाने यावर काय भूमिका घेतली, याकडे आता सर्व रिक्षाचालकांचे लक्ष लागले आहे.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश शेतकऱ्यांसाठी २ लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा आमदार Sudhir Mungantiwar यांनी ११ मार्च २०२५ रोजी विधानसभेत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा अत्यंत ठामपणे उपस्थित केला होता. शेतीसमोरील वाढत्या आर्थिक अडचणींचा विचार करता शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या माध्यमातून तातडीने दिलासा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते.

शेतीतील आर्थिक संकटामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी बांधवांना कर्जमाफीद्वारे मोठा दिलासा मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही भूमिका आ. मुनगंटीवार यांनी विधानसभेत मांडली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी यंदाच्या




अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेल्या या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे शेतकरी बांधवांकडून आभार व्यक्त केले जात आहेत.

# संपादकीय

## एका स्थलांतराचं चिंतन....

काही दिवसांपूर्वी सकाळी लवकरच आवरून गोव्याकडे निघालो होतो. गोव्याच्या सीमेजवळ पोहोचायला सात-साडेसात वाजले होते आणि अनेक ठिकाणी मुलं शाळेला जाण्यासाठी उभी होती. ती शाळेत जाण्यासाठी गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या बसची वाट पाहत होती, हे पाहताक्षणी लक्षात येत होतं. पण काही अर्थबोध होत नव्हता. त्याच दिवशी दुपारी दोननंतर परत येताना तीच मुलं शाळेतून परतताना दिसली आणि ती गोव्याकडून येणाऱ्या बसमधून उतरत होती. ते पाहून मी माझ्यासोबत प्रवास करणाऱ्या बाईंकडे चौकशी केली, तेव्हा त्या म्हणाल्या, 'अहो, ती मुलं राहतात महाराष्ट्रात आणि शाळेसाठी गोव्यात जातात. गेली अनेक वर्षं हे चाललंय. माहीत नाही का तुम्हाला?' मी 'माहीत नाही' असं म्हणताच त्यांनी अधिकची माहिती द्यायला सुरुवात केली. आपल्याकडे इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्यासाठी अवाढव्य फी भरावी लागते, गोव्यात मात्र ते पूर्ण मोफत आहे. शाळेत जायला यायला मोफत बससेवा आहे त्यांची, मोफत माध्यान्ह भोजनही असतं. शिवाय पुस्तकं, गणवेश वगैरेही मोफत असतं... वगैरे वगैरे माहिती त्या देत होत्या. त्यातली किती सत्य आणि किती असत्य याचा पडताळा मी घेतला नाही' कारण माझ्या डोक्यात वेगळाच विचार सुरू झाला होता, तो होता शिक्षणासाठी होणाऱ्या स्थलांतराचा.वर नमूद केलेल्या उदाहरणात शिक्षणासाठी होणारं स्थलांतर हे तात्पुरतं आहे. मुलं सकाळी वेगळ्या राज्यात असणाऱ्या शाळेत जातात आणि संध्याकाळी आपापल्या घरी परततात. यात गमतीची एक गोष्ट अशी की, राज्य बदललं की राज्याचं शैक्षणिक धोरण बदलतं, प्रत्येक राज्याच्या संस्कृतीचं प्रतिबिंब त्यांच्या शैक्षणिक धोरणात, शिक्षण पद्धतीत उमटत असतं. अशा तात्पुरत्या स्थलांतरामुळेही आपोआपच सांस्कृतिक अभिसरण होतच असेल असा विचार मनात आला. याबरोबर अजून काय होत असेल बरं, असंही वाटलंच. यासाठी एकदा सवडीने सीमेजवळ राहणाऱ्या माझ्या एका शाळासोबत्याशी फोन करून याविषयी बोलले. तो म्हणाला, 'महाराष्ट्र - गोव्याच्या सीमेवर हे सहजगत्या पाहायला मिळतं. स्वत:चं उदाहरण देत त्याने सांगितलं की, माझी मुलगी गोव्यात शिकली आणि मुलगा महाराष्ट्रात शिकतो आहे. त्यांच्या आचारविचारात मला सहजच जाणवेल असा फरक दिसतो. मुलीचं वागणं बोलणं गोव्याच्या संस्कृतीशी जुळणारं आहे आणि मुलाचं महाराष्ट्रीयन, पण एक महत्त्वाचा मुद्दा तुला सांगतो, गोव्यात शिकलेली मुलं खूप आस्तिक असतात, तेवढी आपल्याकडे शिकणारी मुलं नसतात.' एका सर्वसामान्य माणसाने, ज्याचा शिक्षणक्षेत्राशी कोणताही संबंध नाही, त्याने शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारांचं निरीक्षणातून नोंदवलेलं हे मत. त्याच्याशी माझं संभाषण या वाक्यावरच थांबलं, तरीही माझ्या मनात मात्र शिक्षणासाठी होणाऱ्या स्थलांतरावर विचार सुरूच होता.शिक्षणासाठी होणारं स्थलांतर ही काही आत्ताची गोष्ट नाही. फार पूर्वीपासून हे घडतच आहे पण देशात शिक्षणाचं सार्वत्रिकीकरण झाल्यावर त्याचं प्रमाण कमी होणं खरं तर आवश्यक होतं, पण तसं ते घडत असताना दिसत नाही, याबद्दल खंत वाटलीच, त्याचबरोबर हे का घडतं आणि त्याचे परिणाम कोणते, यावर अधिकाधिक विचार सुरू झाला. खरं तर मी स्वत: आणि माझा मुलगा असे दोघेही या स्थलांतराच्या प्रक्रियेतून गेलो आहोत. मी शाळेत शिकत होते तेव्हा माझे वडील ज्या गावात नोकरी करत होते तेथे माध्यमिक शिक्षणाची उपलब्धता नव्हती त्यामुळे मी माध्यमिक शिक्षणासाठी आमच्या एका जवळच्या नातेवाईकांच्या घरी स्थलांतरित झाले तर आमच्या गावात उच्च माध्यमिक शिक्षणासाठी काही विषयांच्या शिक्षकांची कमतरता असल्याने माझा मुलगा वेगळ्या शहरात उच्च माध्यमिक शिक्षणासाठी गेला. खरे तर आमचे दोघांचेही आचार विचार आणि उच्चार त्यानंतर बदलले, कारण पौंगंडावस्थेत झालेल्या स्थानांतरामुळे हे स्वाभाविकच आहे, पण आज जेव्हा बारकाईने विचार करते तेव्हा लक्षात येतं की माझ्यावर त्या कुटुंबाचा प्रभाव दिसतो तर माझ्या मुलावर सामाजिक प्रभाव दिसतो. त्याची शिक्षणासाठीची जेवढी गावं, जेवढ्या संस्था झाल्या त्या सगळ्यांचा एकत्रित प्रभाव त्याच्यावर दिसतो. कारण त्याचा या काळात कुटुंब या संस्थेशी संपर्क न येता फक्त शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांशी संबंध आला. त्यामुळे असं होणं स्वाभाविकच आहे.त्यानंतरही स्वाभाविकपणे काळ बदलला आणि त्या बदलाचा वेग जास्त असल्याने तो खूप मोठ्या प्रमाणात झाला. आजकाल शैक्षणिक संस्था ह्या कचकड्याच्या बाहुल्या झाल्या आहेत, हे उघड वास्तव आहे. त्यामुळे आपलं मूल कोणत्या संस्थेत शिकतं त्या संस्थेच्या वातावरणाचा, तिच्या तत्त्वांचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतच नाही तर एखाद्या कॅडमीत तो विद्यार्थी एखाद्या घाण्याच्या बैलासारखा अभ्यास करत असतो. जो फक्त पुस्तकी अभ्यास असतो आणि ज्यातून पुढे फक्त पैसा कमवायचा असतो. आजकाल नाहीसं होत चाललेलं समाजभान पाहिलं की याचं कारण या मुलांच्या लहानपणापासून कुटुंबाशी तुटलेल्या नाळेत दिसतं, असं म्हटलं तर कुणाला राग येऊच नये. बरोबरच भाषा, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र यांना अत्यंत गौण मानत असल्याने भावना, भौगोलिक व सामाजिक जाणीव यापासून आपलं मूल दूर जातं, ते परत तिथे आणणं अवघडच नाही तर अशक्य आहे.पूर्वी खेडोपाडी अनेक व्यक्तींच्या मिळून असणाऱ्या कुटुंबाला संयुक्त किंवा एकत्र कुटुंब मानत असत. पण आता ग्रामीण भागात असं दिसत आहे मी जिथे आई वडील आणि मुलं राहतात असंच कुटुंब हे एकत्रित म्हणावं की काय. काही वर्षांपूर्वीपर्यंत निवासी शाळा ही फक्त अतिश्रीमंतांची चैन होती किंवा न ऐकणाऱ्या मुलांना बोर्डिंग स्कूल मध्ये पाठवलं जायचं आणि बाकीच्यांना फक्त तशी धमकी मिळायची पण आजकाल अनेक सर्वसामान्य घरांतून मुलांना निवासी शाळांमध्ये पाठवलं जातं. कारण तिथे असणाऱ्या शैक्षणिक सोयी आणि शिस्त. आम्हाला जे मिळालं नाही ते आपल्या मुलांना मिळावं ही इच्छा आपण सगळेच समजू शकतो पण ती इच्छा पूर्ण करण्यासाठी कुटुंबापासून मुलांची अशी नाळ तोडणं योग्य आहे का, याचा विचार करणं गरजेचं आहे. हे पोटतिडकीने लिहायचं कारण म्हणजे परवाच एक जाहिरात वाचली, त्यात नर्सरीपासून निवासी शाळेचा उल्लेख पाहून मी हादरूनच गेले.नर्सरी म्हणजेच बालवाडीपासून निवासी शाळा अशी जाहिरात मी अगदी अलीकडेच पाहिली असेल तरीही चांगल्या दर्जाच्या शिक्षणासाठी शहरांमध्ये मुलांसह स्थलांतरित होऊन तात्पुरता संसार थाटणाऱ्या अनेक आया मी जवळून पाहिल्या आहेत. आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपल्या कुटुंबापासून दूर राहून मुलांची शाळा, त्यांचा अभ्यास सांभाळणाऱ्या, त्यांच्यासाठी आपल्या उमेदीची वर्षे गावातील घर, शहरातील बिऱ्हाड यांच्या जोडणीसाठी घालवणाऱ्या आयांची ओढाताण मी अनेकदा जवळून पाहिली आहे. काही जणींनी तर आपले कारिअर पणाला लावत मुलांसोबत राहण्याचा निर्णय घेतलेलाही मी पाहिला आहे.वर वर्णन केलेल्या सगळ्या मुद्द्यांमध्ये फक्त नकारात्मकताच आहे असं नाही, पण त्यात दर्जेदार शिक्षण हा जसा सकारात्मक घटक आहे तसेच कुटुंबापासून आणि गावापासून लहान वयातच दुरावल्यामुळे तुटणारे भावनिक बंध, गावच्या मातीच्या वासाला लहानपणापासून पारखे झाल्यामुळे कमी झालेली ओढ, जे शिक्षण देण्याची सोय गावागावात आहे ते विकत घ्यावे लागल्यामुळे कुटुंबांची होणारी आर्थिक ओढाताण, कुटुंबातील व्यक्तींना विशेषत: पतीपत्नींना विभक्त राहावे लागत असल्याने होणारे मानसिक व भावनिक त्रास, प्रामुख्याने स्त्रियांना करावी लागणारी तडजोड, शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास याला फासलेला हरताळ अशा गोष्टींकडे लक्ष वेधण्यासाठीचा हा एक प्रयत्न आहे.या सगळ्या परिस्थितीमधून एक पालक म्हणून मीही गेले आहे आणि त्यावेळी जे योग्य वाटले ते निर्णय घेतलेही आहेत. त्यामुळे काय चूक, काय बरोबर याचा विचार करणे हा या लिखाणाचा उद्देश नाही तर काय घडतंय आणि त्याचे परिणाम काय होतात किंवा होतील याचा विचार करणे हा मुख्य उद्देश आहे. मध्यंतरीच कुठेतरी वाचलं होतं की युरोपातून स्थलांतर करणाऱ्या करकोचा या पक्ष्यांने युरोपातील तापमान त्याला सुसह्य झाल्यावर आणि त्याची अन्नाची गरज पूर्ण होऊ लागल्यावर स्थलांतरित होणे थांबवले. आपल्याकडे शिक्षणाबाबत तसे होऊ शकेल यासाठीच हा ऊहापोह. शिक्षणासाठीचे स्थलांतर हा विषय सर्वपरिचित आहे, पण त्यासंबंधी विचार मात्र नक्कीच करायला हवा हे खरं.

# गोरेगाव मुलुंड जोड मार्ग प्रकल्प बाधितांना कांजूर पश्चिम येथे मिळणार आधुनिक सुविधांनी युक्त ३०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या टुमदार सदनिका

## अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री.अभिजीत बांगर यांचे निर्देश

### ९०६ सदनिकांचे बांधकाम प्रगतिपथावर; पैकी २५२ प्रकल्प बाधितांचे पहिल्या टप्प्यात पुनर्वसन

### बांधकाम वेळेत पूर्ण करुन लवकरात लवकर सदनिका प्रकल्पबाधितांना सुपूर्द कराव्यात

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**



आज बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गोरेगाव - मुलुंड जोड मार्ग (GMLR) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या रस्ते विकासा प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांच्या निवासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कांजूर (पश्चिम) येथे 'बृहन्मुंबई प्रकल्पबाधित गृहनिर्माण प्रकल्प' अंतर्गत सुमारे १० हजार ५० चौरस मीटर क्षेत्रफळावरील ७ इमारतींमध्ये ९०६ सदनिकांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. पैकी २ इमारतींचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून २५२ प्रकल्प बाधितांचे मार्च २०२६ आजअखेरपर्यंत पुनर्वसन करावे. उर्वरित सदनिकांचे बांधकाम ठरलेल्या वेळेत पूर्ण करावे. जेणेकरून, त्या लवकरात लवकर तसेच या प्रकल्पबाधितांना सुपूर्द करता येतील. तसेच, प्रकल्पाच्या ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची पूर्तता करण्यासाठीही आवश्यक उपाययोजना तत्काळ कराव्यात, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. आज या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'बृहन्मुंबई प्रकल्पबाधित गृहनिर्माण प्रकल्प' अंतर्गत कांजूर (पश्चिम) येथे गोरेगाव - मुलुंड जोड मार्ग आज प्रकल्पबाधितांसाठी बांधण्यात येत असलेल्या सदनिकांची श्री. अभिजीत बांगर यांनी शुक्रवारी (दिनांक ६ मार्च २०२६) प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. नगर अभियंता श्री. रामचंद्र कदम, प्रमुख अभियंता (पूल) श्री. राजेश मुळे यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.गोरेगाव - मुलुंड जोड मार्ग (GMLR) प्रकल्प हा एकूण चार टप्प्यांमध्ये प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे बाधित या नागरिकांच्या निवासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कांजूर (पश्चिम) येथे सुमारे १०,०५० चौरस मीटर क्षेत्रफळावर ७ इमारती बांधण्यात येणार आहेत. यामध्ये, तळमजला + २३ मजल्यांच्या इमारतींचा समावेश आहे. या ५ इमारतींमध्ये प्रकल्पबाधितांसाठी एकूण ९०६ सदनिका बांधण्यात येत आहेत. प्रत्येक सदनिकेचे क्षेत्रफळ ३०० चौरस फूट असून त्यामध्ये बैठक, शयनकक्ष (संलग्नित स्वच्छतागृह), स्वयंपाकघर यांचा समावेश आहे. तसेच, प्रकल्पाच्या परिसरात बाजार, सामुदायिक सभागृह, वाचनालय, आरोग्य केंद्र, सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) आदी सुविधाही पुरवण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर, बांधकामाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी श्री. बांगर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यामध्ये सदनिकांच्या आतमधील संरचना; पाणी, स्वच्छतागृह, वीज, उद्वाहन (लिफ्ट), पायऱ्या, अग्निसुरक्षाविषयक उपाययोजना आदींची गुणवत्ता तसेच त्यासंबंधित महत्त्वपूर्ण बाबींची त्यांनी अत्यंत बारकाईने पाहणी केली आणि एकंदर प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले. सदनिकांचे बांधकाम योग्यप्रकारे आणि दर्जेदारपणे सुरू आहे. तथापि, याठिकाणी वास्तव्यास येणाऱ्या प्रकल्पबाधित नागरिकांसाठी अन्य आवश्यक सोयीसुविधांचीही विहित वेळेत पूर्तता करावी. तसेच, सदनिकांचे बांधकाम ठरलेल्या वेळेत पूर्ण करुन या सदनिका त्यांना लवकरात लवकर उपलब्ध करुन दिल्या जातील, यासाठी योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही श्री. बांगर यांनी यावेळी दिल्या.श्री. बांगर म्हणाले की, गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग (ऋध्डठ) प्रकल्प टप्पा ३ अंतर्गत जून २०२६ पासून बोगदा खनन संयंत्राद्वारे भूमिगत बोगद्यांच्या खोदकामास सुरुवात केली जाणार आहे. तत्पूर्वी, अमर नगर येथे लॉन्चिंग शाफ्टचे काम सुरु होणे अपेक्षित आहे. त्यासाठी जागेची आवश्यकता आहे. अमर नगर येथील प्रकल्प बाधितांचे कांजूर (पश्चिम) येथे पुनर्वसन केले जाणार आहे. पात्र कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी ७ इमारतींमध्ये सुमारे ३०० चौरस फुटांच्या सदनिकांची उभारणी करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्त नागरिकांना सुरक्षित व सन्मानजनक निवास उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा पुनर्वसन उपक्रम राबविण्यात येत आहे. या गृहनिर्माण संकुल परिसरात अंतर्गत रस्ते, मोकळी जागा आणि आवश्यक नागरी सुविधा विकसित करण्यात येत आहे. २ इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून मार्च २०२६ अखेरपर्यंत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (Completion Certificate) मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात २५ सदनिका उपलब्ध होतील. तर, उर्वरित ५ इमारतींना एप्रिल २०२६ अखेरपर्यंत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळणे अपेक्षित आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ करण्याचे निर्देश संबंधितांना दिल्याचे श्री. बांगर यांनी नमूद केले.

# स्त्री म्हणजे प्रेरणा,शक्ती आणि आत्मविश्वासाचे प्रतीक-सौ.अर्चनाताई

## जागतिक महिला दिना निमित्त शारदा इंग्लिश स्कूल केज येथे महिला शिक्षकांचा सन्मान

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**




शारदा इंग्लिश स्कूल केज येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शाळेच्या वतीने व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस यांच्या वतीने शारदा इंग्लिश स्कूल केज येथे कार्यरत महिला शिक्षकांचा मोठ्या उत्साहात सन्मान करण्यात आला.याप्रसंगी शाळेच्या मार्गदर्शिका सौ.अर्चनाताई आडसकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.त्यांच्या हस्ते सर्व महिला शिक्षकांचा यथोचित सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी शाळेचे प्राचार्य डॉ.मिश्रा एस.एम,उप प्राचार्य श्री. सुरज सनी,श्री.देशमुख पी.एम याची उपस्थिती होती.याप्रसंगी बोलताना संस्थेच्या संचालिका सौ. अर्चनाताई आडसकर यांनी महिला ही प्रेरणा, शक्ती आणि आत्मविश्वासाचे प्रतीक असल्याचे सांगितले.हा दिवस महिला वरील अत्याचारा विरोधात लढण्याचा आणि त्यांच्या हक्काच्या लढ्याला पाठिंबा देण्याचा असल्याचे त्यांनी सांगितले.समाजात व कामाच्या ठिकाणी समानता वाढवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे आपल्या मनोगतात सांगितले.शाळेचे प्राचार्य डॉ.श्री.मिश्रा एस.एम यांनी आपल्या मनोगतात शारदा इंग्लिश स्कूलच्या महिला शिक्षिकांची संख्या साठ पेक्षा जास्त असून त्यांना दिलेल्या सन्मानामुळेच कित्येक वर्षापासून या महिला ज्ञानदानाचे कार्य करत असल्याचे सांगितले. उपप्राचार्य सुरज सनी यांनी संस्थेच्या वतीने पर राज्यातील महिला शिक्षिकांना अतिशय सन्मानाची वागणूक मिळत असल्यानेच मोठ्या प्रमाणात इतर राज्यातील महिला शिक्षिका शारदा इंग्लिश स्कूलमध्ये गत अनेक वर्षांपासून कार्यरत असून त्यांना मानसन्मान व प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम शारदा इंग्लिश स्कूल केज ने केले असल्याचे त्यांनी आपल्या मनोगत सांगितले.शाळेने व संस्थेने केलेल्या सन्मानाने महिला शिक्षिका भारावून गेल्या होत्या.आगामी काळात आणखी चिकाटीने व जिद्दीने त्यांना ज्ञानदानाचे कार्य करू असे आश्वासन सर्वांच्या वतीने देण्यात आले. सदरील रेखीव कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.रमीज एम.एच यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप जयसिंग काळे सर यांनी केला.

# येवता येथे श्रमदान करत साजरा झाला जागतिक महिला दिन सखी सुखी उपक्रमाचा पुढाकार



**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील येवता येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवचेतना सर्वांगीण विकास केंद्र,केज अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या 'सखी सुखी' प्रोग्रामच्या वतीने अनोख्या पद्धतीने महिला दिन साजरा करण्यात आला.केवळ भाषणे न करता,गावात श्रमदान करून सखींनी सामाजिक बांधिलकी जपली.गावात श्रमदान आणि स्वच्छता मोहीमकार्यक्रमाची सुरुवात सखी सुखीग्रुपच्या लीडर रजनी गायकवाड,आशा जोगदंड आणि अनुसया सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.महिला दिनानिमित्त या सखींनी एकत्र येत गावातील परिसरात श्रमदान केले. स्वच्छता हीच सेवा हा संदेश देत महिलांनी गावात प्रत्यक्ष काम करून महिला शक्तीचा परिचय करून दिला.महिलांचा सत्कार आणि मार्गदर्शन श्रमदानानंतर आयोजित मुख्य कार्यक्रमात गावातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रजनी गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.त्यांनी 'सखी सुखी' ग्रुपच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला महिलांचे आरोग्य,त्यांचे आर्थिक स्वावलंबन आणि कौटुंबिक सुख या गोष्टी कशा साध्य करता येतील,यावर त्यांनी सविस्तर चर्चा केली.

**महिलांची मोठी उपस्थिती**

या कार्यक्रमात समाजा तील विविध स्तरांतील महिलांनी सहभाग नोंदवला.यामध्ये प्रामुख्याने अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा वर्कर,एकल महिला संघटनेच्या पदाधिकारी रत्नमाला गायकवाड व सुरेखा गायकवाड व गावातील इतर महिलांनीही या उपक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता.महिलांच्या एकजुटीमुळे आणि त्यांच्या सामाजिक कार्यामुळे हा कार्यक्रम तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.महिलांनी केवळ घरात न थांबता समाजाच्या विकासातही वाटा उचलला पाहिजे. श्रमदानाच्या माध्यमातून आम्ही हाच संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.- रजनी गायकवाड (लीडर,सखी सुखी प्रोग्राम)

# बुधोडा शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**औसा । प्रतिनिधी**

जि.प.प्रा.शा.बुधोडा येथे ०६/०३/२०२६ रोजी स्वयंशासन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.या उपक्रमात मुख्याध्यापक म्हणून करण गुरमे व उपमुख्याध्यापक म्हणून कु. शुभांगी भूत्ते हिने अतिशय उत्कृष्टपणे शाळेचे संपूर्ण कामकाज जबाबदारीने सांभाळले कार्यक्रमाची सुरुवात परिपाठाने झाली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी विविध वर्गांमध्ये जाऊन विषयांचे अध्यापन केले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व नियोजनबद्ध पद्धतीने अध्यापन करत शिक्षकांच्या भूमिकेचा उत्तम अनुभव घेतला. शिस्त, नेतृत्वगुण आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व समजले तसेच शिक्षण प्रक्रियेबद्दल आदर आणि जाणीव अधिक दृढ झाली.असे मत आपल्या मनोगतातूनत्यांनी व्यक्त केले.दिवसभर विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका समर्थपणे पार पाडत शाळेचे वातावरण उत्साहपूर्ण ठेवले.कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होते,असे सांगितले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दौंड शहरात विद्युत वितरण कंपनी व महापारेषण चा भोंगळ कारभार व कंत्राटी कामगार यांच्या जीवाशी खेळ!

**दैनिक वादळ वार्ता**
**दौंड । प्रतिनिधी**

दौंड शहरात गजानन हौसिंग सोसायटी जवळ व रामकृष्ण मंगल कार्यालया जवळ असणारे महापारेषण व विद्युत वितरण कंपनी चे डी.पी. ( ट्रान्स्फर व हायटेंशन लाईन गेली आहे तेथे आग लागली होती.) या ठीकाणी चार वाजण्याच्या सुमारास आग लागली होती. आग विझवण्यासाठी तातडीने दौंड नगरपरिषद अग्निशमन वाहन दाखल होऊन आग विझवण्यासाठी पाणी मारून आग विझवण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यांनी आग विझली ह्या ठीकाणी विद्युत वितरण कंपनी चे किंवा महापारेषण चे कर्मचारी उपस्थित होते. मी पत्रकार दैनिक लोकन्याय संघर्ष चा घटना स्थळी उपस्थित होतो व पाहत होतो. त्याचे फुटेज सुद्धा मी माझ्या मोबाईलमध्ये कैद केले आहे. त्यादरम्यान मी अग्निशमन दौंड नगरपरिषदेचे अधिकारी यांना फोन करून विचारले असता त्यांनी फोन उचलला आणि फोन आल्यावर मी तातडीने अग्निशमन दलाचे वाहन पाठवले आहे हे सांगितले पण मी त्यांना हा प्रश्न केला विद्युत ठिकाणी आग लागल्यावर पाणी वापरून आग विझवता येते का? फोन कट केला मला आश्चर्य वाटले आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मी दौंड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अवधूत तावडे यांना फोन केला असता त्यांनी फोन उचलला पण मी ही घटना सांगितली आसता त्यांनी मला विचारले कोण बोलत आहे मी सांगितले मी पत्रकार जयदीप बगाडे बोलत आहे त्या वर त्यांनी विचारले तुम्ही स्पिकर कॅन केला आहे का? तुमचा आवाज वेगळा येत आहे. असो पण त्याच्या कडे माझा नंबर सेव्ह आहे आणि नसेल तर हे त्यांनी उत्तर दिले पाहिजे. मी गंभीर घटनेचा तपशील सांगितला जर पाणी मारताना विद्युत ठिकाणी एकदा कर्मचारी दगावू शकतो तर त्यांनी मी बाहेर आहे मला माहीत नाही आसे उडवाउडवीची उत्तरे दिली आहे. मी नंतर पुन्हा एकदा अग्निशमन दलाचे अधिकारी शाहू पाटील यांना फोन करून सांगितले ही गंभीर घटना आहे. हया मध्ये तुमच्या कडे अग्निशमन दलाचे जवान जे ठेकेदार यांनी नेमले आहे ते कायदेशीर ट्रेनिंग घेतलेले दिसत नाही कारण ते विदयूत ठिकाणी पाणी मारुन आग विझवण्यासाठी प्रयत्न करत आहे.हया मध्ये शॉक लागून तूमच्या ठेकेदार कामगारांचा व जवळ उपस्थित असणाऱ्या चा मृत्यू होऊ शकतो. तूम्ही हे कामगार ज्यांना ह्या संदर्भात नॉलेज नसेल तर कसे कामांवर ठेवले आहे. हया ठेकेदार यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. त्यानी मला माहीत घेऊन सांगितले जाईल असे उत्तर दिले पण ह्यांना माहिती नसेल तर




आश्चर्य वाटत आहे. तसेच तीथे असणारे विद्युत वितरण कंपनी व महापारेषण चे कर्मचारी यांना विचारले असता त्यांनी मला सांगितले आम्ही सप्लाय बंद केला आहे. हे जरी खरे असले तरी हायस्टेशंनचा संपल्याय बंद करता येत नाही किंवा केला असेल तर तशी नोंद आहे का? हे सर्व असले तरी हया विदयूत वितरण कंपनी व महापारेषण चे कर्मचारी यांनी प्राथमिक आग विझवण्यासाठी प्रयत्न का केले नाही? आगोदर ह्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न करणे कायदेशीर बंधन कारक आहे पण घटना स्थळी तसे दिसले नाही. ह्यांना ह्या संदर्भात ट्रेनिंग दिलेले असते व तसे आग विझवण्यासाठी उपकरण उपलब्ध असतात त्यावर लाखों करोडो खर्च होतो मंग हे कुठे होते.यांनी प्राथमिक आग विझवण्यासाठी प्रयत्न का केला नाही हा प्रश्न उपस्थित होतो. ह्यांनी सिक्युरिटी गार्ड ठेवले आहे ह्यांना सुद्धा ह्याचे प्रक्षिक्षण आसते तरी तसे घटना स्थळी दिसले नाही. हयाचा अर्थ असा होतो की, ह्या संदर्भात जो निधी असतो ते विजवितरण विभाग,महापारैषण विभाग व दौड नगरपरिषद हे संगनमताने खात असून ठेकेदार पध्दतीने काम करणारे व जनतेच्या जीवाशी खेळ करत आहे. हया संदर्भात दौंड नगर परिषदेचे मुख्याधिकारी,विजवितंरण कंपनी,महापारेषण कंपनी, दौंड तहसीलदार, दौंड प्रांत अधिकारी व पुणे जिल्हा अधिकारी काय कारवाई करणार या कडे सर्व दौंड च्या जनतेचे लक्ष लागले आहे. आणि तसेच आत्ता जबाबदार व्यक्ती म्हणून दौंड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा व दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल हे ह्या संदर्भात काय कारवाई करणार या कडे सुध्दा दौंड च्या जनतेचे लक्ष लागले आहे. ही घटना गंभीर स्वरूपाची असून फोन करुन सुद्धा जबाबदार अधिकारी दौंड नगरपरिषद मुख्याधिकारी व अग्निशमन दलाचे अधिकारी दाखल घेत नसतील आणि ठेकेदार यांना वाचवत असतील तर गंभीर बाब आहे. तसेच दौंड नगरपरिषदेचा जबाबदार अग्निशमन दलाचा कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित का नव्हता आणि असेल तर त्यांनी हे नियम बाह्य काम का केले. विद्युत उपकरण व त्या उपकरणा जवळ आग लागली तर नियमाने उज२ किंवा फेम चा वापर करणे बंधनकारक आहे मात्र तसे न करता पाण्याचा वापर करुन कर्मचारी व जनतेचा जीव धोक्यात घातला आहे. हया संदर्भात सर्व जबाबदारी कर्मचारी, अधिकारी यांच्या वर जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रांत अधिकारी किंवा ह्याचे जबाबदार अधिकारी काय कारवाई करणार आहे हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# दप्तरमुक्त शाळा एक अभिनव उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

दिनांक ७ मार्च रोजी जिल्हा परिषद हायस्कूल भायेगाव ता . जि . नांदेड शाळेमध्ये एस जी. जी.एस. मॉर्निंग ग्रुप तर्फे डॉ‌ प्रबिर कार डॉ.प्रदीप सोलनकर प्रो.अशोक कामठाने सर्व सेवानिवृत्त प्राध्यापक एस जी जी एस इंजिनिअरिंग कॉलेज नांदेड श्री शिवाजीराव शिंदे सेवानिवृत्त प्रोग्रामर एस जी एस कॉलेज नांदेड व डॉक्टर अमित अग्रवाल सर डेंटिस्ट नांदेड सर्व हेल्थ फिटनेस ग्रुप नांदेड यांना दप्तर मुक्त शाळा कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा परिषद हायस्कूल भायगाव शाळेत बोलावण्यात आलेङ सर्व तज्ञ मंडळींनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. त्यामध्ये व्यायामाचे महत्त्व ,व्यवसायिक मार्गदर्शन , हसण्याचे फायदे ,जीवन कौशल्य ,गणित विषयाबद्दल मार्गदर्शन ,व्यवसायिक मार्गदर्शन गणित विषयाबद्दल व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले विद्यार्थी व



सर्व शिक्षकांचे कौतुक सर्व प्राध्यापक मंडळींनी केले व डॉक्टर अग्रवाल सरांनी इयत्ता आठवी नववी दहावीच्या विद्यार्थ्यांचे दात तपासले व विद्यार्थ्यांना दाताचे आजार व स्वच्छता चे फायदे सांगितलेङ चांगले दात असणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना रोख बक्षीसही दिलेङ त्याचबरोबर इयत्ता आठवी नववी दहावी मध्ये प्रत्येक वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना व खेळात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना५००० रुपयाची रोख बक्षिसे दिलीङ७०००किमतीचे इतर शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना वाटप मान्यवरांनी स्वतः केले . या दातृत्वाला सलाम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दिलिप कल्याणकर सर मु . अ . होतेङ श्री बालाजी कौटिकवार सर यांनी सर्व मान्यवरांना शाळेवर आणण्यासाठी मदत केलीङ याप्रसंगी सूत्रसंचालन श्री मंगेश कोंडलवाडे सर यांनी केले व आभार श्री दत्ता शिंदे सर यांनी मानलेङ याप्रसंगी शाळेतील श्री प्रकाश पेंडलवाड सर श्री फय्युम शेख सर श्रीमती देविका उत्तरवार मॅडम श्रीमती माधुरी येतेजवार मॅडम श्रीमती कोठे मॅडम✻ श्री कस्तुरे सर✻यांनी कार्यक्रमासाठी मदत केली

या कार्यकमातून विद्यार्थ्यांना आनंद, मार्गदर्शन,बक्षिसे व साहित्य मिळाले व यशस्वी कार्यक्रम पार पडला .

# कुंकुमेश्वर स्वामी यात्रेत कॉ.सचिन मोतकुरवार यात्रास्थळ विकासासाठी शासनाकडे मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तालुक्यातील जाफराबाद, टेकडा (ताला) येथे आयोजित करण्यात आलेल्या श्री कुंकुमेश्वर स्वामी यात्रा व कल्याण महोत्सव दरम्यान भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे जिल्हा सहसचिव तथा एआयवायएफ (-खधत्र) राज्य उपाध्यक्ष कॉ. सचिन मोतकुरवार यांनी सिरोंचा दौऱ्यावर असताना यात्रेला भेट देऊन भाविकांशी संवाद साधला.सोबत कॉ.सुरज जककुलवार जि.सदस्य होते

या दौऱ्यावेळी भाकपाचे सिरोंचा तालुका सचिव कॉ. रवी बरसांगडी यांनी दिलेले निमंत्रण स्वीकारून कॉ. मोतकुरवार यांनी दोन दिवस यात्रेत उपस्थिती दर्शवली. त्यांनी स्थानिक भाविक, यात्रेकरू व नागरिकांना मंगलमय शुभेच्छा देत यात्रा शांततेत, सुरक्षित व यशस्वीरीत्या पार पडावी अशी कामना व्यक्त केली. तसेच सर्वांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.



यावेळी परिसरातील नागरिकांनी विविध स्थानिक समस्या मांडल्या. त्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन देत कॉ. मोतकुरवार यांनी यात्रा स्थळाच्या विकासासाठी शासनाकडे किचन शेड, सोलर लाईट, सोलर पाणी पंप व स्वच्छतागृह उभारण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले. यात्रास्थळाचा विकास व भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष लक्ष देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यात्रेदरम्यान उपस्थित असलेल्या ट्रान्सजेंडर बांधवांनीही आपल्या समस्या मांडल्या. त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्यांना समाजात सन्मान, न्याय व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी परिसरातील अनेक भाविक, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैद्यकीय महाविद्यालय पदभरतीत स्थानिक तरुणांना प्राधान्य द्या;अन्यथा आंदोलन–राज बन्सोड यांचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**आरमोरी । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात वाढती बेरोजगारी, संधींचा अभाव आणि रोजगाराच्या मर्यादित सुविधा यामुळे स्थानिक सुशिक्षित तरुण मोठ्या अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गडचिरोली येथे सुरू होणार असलेल्या पदभरती प्रक्रियेत जिल्ह्यातील पात्र व सुशिक्षित युवक-युवतींना प्राधान्य द्यावे, अशी ठाम मागणी आजाद समाज पक्षाचे प्रदेश सचिव धर्मानंद मेश्राम व जिल्हाध्यक्ष राज बन्सोड यांनी केली आहे.

वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयाच्या आधीपत्याखाली गडचिरोली वैद्यकीय महाविद्यालयात वर्ग ३ व ४ ची रिक्त नियमित पदे तात्पुरत्या स्वरूपात बाह्यस्रोताद्वारा भरण्याची आदेश नुकतेच शासनाने काढलेले आहे. त्यानुसार



लवकरच कार्यवाहीला सुरुवात करणार असल्याचे गडचिरोली येथील डीन यांनी सांगितले. या संदर्भात अधिष्ठाता (डीन), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गडचिरोली यांचेशी चर्चा करून आजाद समाज पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. गडचिरोली हा मागास व दुर्गम जिल्हा असून येथील युवकांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण✻ पूर्ण करून पात्रता मिळवलेली आहे. मात्र, बाहेरील उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर संधी दिल्यास स्थानिक तरुणांवर अन्याय होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

राज बन्सोड यांनी निवेदनात नमूद केले आहे की, स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाल्यास त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होईल व जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. त्यामुळे सेवा पुरवठादारामार्फत (आउटसोर्सिंग) होणारी भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, नियमबद्ध आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित राबविण्यात यावी. निवड प्रक्रिया व अंतिम यादी सार्वजनिक करून पारदर्शकता राखावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.जिल्ह्यात बेरोजगार युवकांचे प्रमाण प्रचंड आहे. गडचिरोली जिल्ह्यातील युवकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होता कामा नये . स्थानिकांना प्राधान्य न दिल्यास आजाद समाज पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही राज बन्सोड यांनी दिला आहे. निवेदन देताना पक्षाचे प्रदेशसचिव धर्मानंद मेश्राम, प्रवक्ते प्रितेश अंबादे, धनराज दामले, प्रो. नरेश मोहुर्ले, निखिल निकोडे, सुरेंद्र वासनिक, नितीन दुर्गमवार इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते

# अचलेर येथे रंगपंचमी उत्साहात बालचमु रंगाच्या जल्लोषात



**दैनिक वादळ वार्ता**
**अचलेर । प्रतिनिधी**

अचलेर येथे सकाळपासूनच बालचमू रंगपंचमी खेळण्यात दंग झाले होते.

रंगपंचमीच्या निमित्ताने सर्व मुलामध्ये मोठा उत्साह पाहावयास मिळाला.पाणी आणि रंग या दोन्ही आवडीच्या गोष्टी असल्याने अगदी एक वर्षाच्या मुलापासून हा उत्साह दिसून आला.हिंदू धर्मात होळी या सणाला फार महत्व असून होळीनंतर पाच दिवसांनी धाराशिव जिल्ह्यात रंगपंचमी हा सण साजरा केला जातो.होलिका धनाने सुरू होणारा हा सण रंगपंचमीला संपतो.

रंगपंचमी संपूर्ण भारतात साजरी केली जाते.

धार्मिक शास्त्रानुसार रंगपंचमी हा सण तामसिक आणि राजसिक गुणावर सत्वगुणाच्या विजयाचे प्रतीक मानले जाते.

# समाधान शिबिर'चे उद्घाटन नागरिकांना गतीमान प्रशासनाची अनुभूती यावी यासाठी राज्य सरकारकडून विविध उपक्रम:आ.अभिमन्यू पवार

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ह्यछत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान अंतर्गत औसा तालुक्यातील किणीथोर येथे आयोजित मंडळस्तरीय समाधान शिबिराचे उद्घाटन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांना लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान प्रशासनाची अनुभूती देण्यासाठी राज्य सरकार विविध उपक्रम राबवत असल्याची भावना यावेळी आमदार पवार यांनी व्यक्त केली.या समाधान शिबिराच्या माध्यमातून मंडळातील शेकडो नागरिकांना निराधार योजना, शिधापत्रिका सेवा, घरकुलासाठी मोफत वाळू पास, अद्ययावत सातबारा, बचत गटांसाठी अर्थसहाय्य, लक्ष्मी मुक्ती योजना यांसह सुमारे २० विविध योजनांचा लाभ देण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमांतर्गत औसा तालुक्यात नागरिकांच्या प्रशासकीय अडचणी



तातडीने सोडविण्यासाठी विविध ठिकाणी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांना उपविभागीयअधिकारी अविनाश कोरडे, अधिकारी तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास आनंदकुमार मिरगणे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे.या शिबिरांमध्ये महसूल, कृषी, सामाजिक न्याय, पुरवठा, निवडणूक, आधार कार्ड व भूमी अभिलेख विभागाच्या विविध सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. एक खिडकी योजना अंतर्गत अनेक शासकीय कामांचा निपटारा एकाच ठिकाणी करण्याची सुविधा या शिबिरांमधून दिली जात आहे. नागरिकांना रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जात व अधिवास प्रमाणपत्र, नाव कमी-जास्त करणे, शेतकरी दाखले, जमीन नोंदीतील दुरुस्ती, डिजिटल ७/१२ उतारे वितरण, संजय गांधी निराधार योजनेची माहिती तसेच विविध महसूल विषयक प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे.कृषी विभागाकडून पीएम किसान सन्मान निधी लाभार्थी माहिती व ॲग्रीस्टॅक संदर्भातील माहिती देण्यात येत आहे. सामाजिक न्याय विभागाकडून विविध सामाजिक योजनांची माहिती, आधार लिंकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच आधार कार्ड दुरुस्ती व नवीन नोंदणी, शिधापत्रिकेत नाव वाढवणे किंवा कमी करणे, आरोग्य योजनांसाठी प्रमाणपत्र देणे, मतदार यादीतील नाव समाविष्ट करणे किंवा दुरुस्ती करणे तसेच जमीन मोजणी अर्ज स्वीकारणे अशा अनेक सुविधा या शिबिरांमध्ये उपलब्ध आहेत.हे शिबिर तहसील कार्यालय औसा व उपविभागीय कार्यालय औसा-रेणापूर यांच्या समन्वयातून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. तालुक्यातील नागरिकांनी आपल्या समस्या व प्रलंबित कामांसाठी संबंधित तारखेला शिबिरस्थळी उपस्थित राहून या सुविधांचा लाभघ्यावा, असे आवाहन औसा तहसीलदार घनश्याम आडसुळ यांनी केले आहे.

# बीडमधील नागरी वनासाठी राज्य सरकारकडूनच नाही प्रस्ताव

## खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नावर मंत्री कीर्तीवर्धन सिंह यांचे उत्तर

### खा.सोनवणे यांचे असे होते प्रश्न

* महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा असून येथे भूजल पातळी घटणे, कमी हरित आच्छादन आणि हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम गंभीर स्वरूपात दिसून येत आहेत, याची सरकारला माहिती आहे का?.
* नगर वन योजना अंतर्गत बीड जिल्ह्यात आतापर्यंत किती शहरी वनांना मंजुरी देण्यात आली आहे, विकसित करण्यात आले आहे किंवा प्रस्तावित आहेत?.
* अशा मंजूर किंवा प्रस्तावित शहरी वनांचे ठिकाणनिहाय तपशील, त्यांची सध्याची प्रगती आणि पूर्ण होण्याची संभाव्य कालमर्यादा काय आहे?.
* पर्यावरणीय समतोल, पर्जन्यमान वाढ आणि जलसंधारण लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला विशेष प्राधान्य श्रेणीत समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे का?

### प्रस्ताव दिल्यास बीडला फायदा

दरम्यान, बीड जिल्ह्यात हरित क्षेत्र वाढविणे, पर्यावरणीय समतोल राखणे आणि जल संवर्धनाच्या दृष्टीने भविष्यात राज्य शासनाने प्रस्ताव सादर केल्यास केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून त्याचा विचार केला जाऊ शकतो, असेही संकेत या उत्तरातून मिळाले आहेत.

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीडकडे दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून पाहिले जाते, येथील दुष्काळीस्थिती बदलण्यासाठी उपाययोजना आवश्यक असून खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यातील भूजल पातळी घटणे, कमी होत चाललेले हरित क्षेत्र आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम या गंभीर विषयाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करून केंद्र सरकारचे लक्ष वेधले होते. दरम्यान, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत केंद्र सरकारने उत्तर दिले असून यात नागरी वनांसाठी राज्य सरकारनेच प्रस्तावच दिलेला नाही, असा खुलासा केला आहे. यामुळे राज्यसरकारचा कारभार चव्हाट्यावर आलेला आहे.

बीडचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी म्हटले, देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाण्याची टंचाई, मर्यादित हरित क्षेत्र आणि हवामानातील बदल यांसारखी पर्यावरणीय आव्हाने दिसून येतात. या समस्यांवर मात करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांकडून विविध वृक्षारोपण तसेच पर्यावरणीय पुनस्थापना कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हरित क्षेत्र वाढण्यास मदत होत असून पर्यावरणीय आव्हानांचे परिणाम कमी करण्यास हातभार लागत आहे. मंत्रालयाकडून 'नगर वन योजना' राबविण्यात येत असून शहरांमध्ये नागरी वनांची निर्मिती व विकास करण्यासाठी ही योजना लागू आहे. राज्यांचे वन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका तसेच इतर शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेसाठी राष्ट्रीय प्रतिपूरक वनीकरण निधीमधून आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेचा मुख्य उद्देश शहरांमध्ये हरित क्षेत्र वाढविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे तसेच नागरिकांना पर्यावरणीय, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक लाभ उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, बीड जिल्ह्यात नागरी वन उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून अद्याप कोणताही प्रस्ताव केंद्र सरकारकडे प्राप्त झालेला नसल्याची माहिती राज्यमंत्र्यानी दिली. राज्य सरकारकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास, उपलब्ध जमीन आणि निधीच्या आधारे योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यावर विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. खा.बजरंग सोनवणे हे बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने लोकसभेत आवाज उठवत असल्याचे वारंवार दिसत आहे.



### बीडला नाही विशेष प्राध्यान्य

पर्यावरणीय समतोल राखणे, पावसाचे प्रमाण वाढविणे आणि जलसंवर्धन या बाबी लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला विशेष प्राधान्य श्रेणीत समाविष्ट करण्यासाठी सध्या या मंत्रालयाकडे कोणतीही स्वतंत्र योजना उपलब्ध नसल्याचेही सरकारने स्पष्ट केले.


## भगवान श्रीकृष्ण आश्रम केज येथे श्रीराम कथा व १०८ कुंडी महाविष्णु यज्ञाची तयारी पूर्ण

### भव्य यज्ञ मंडपाने भाविकांचे लक्ष वेधले

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

भगवान श्रीकृष्ण आश्रम केज येथे श्रीराम कथा व १०८ कुंडी महाविष्णु यज्ञाची तयारी पूर्णत्वाला आली असुन भव्य यज्ञ मंडपाने भाविकांचे लक्ष वेधले आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की,अहमदपूर - अहिल्या नगर राष्ट्रीय महामार्गा लगत असलेल्या केज येथील भगवान श्रीकृष्ण आश्रम,परिसरात श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु यज्ञयाग,व रामायणाचार्य ह.भ.प. रामराव ढोक महाराज नागपूर यांच्या संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.हा धार्मिक कार्यक्रम बुधवार दि.११ मार्च ते गुरुवार दि. १९ मार्च या कालावधीत संपन्न होणार आहे.



या महाविष्णु यज्ञ,राम कथा व किर्तन सोहळ्या साठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.संगीत रामकथा रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक नागपूर यांच्या रसाळ वाणीतुन सादर होणार असून दररोज सकाळी ८ ते ११ वाजता महाविष्णु १०८ कुंडीयज्ञ दुपारी २ ते ५ संगीतमय तुलसी रामायण कथा, सायंकाळी धार्मिक विधी, रात्री ८ ते १० हरीकीर्तन व हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात विविध संत-महात्म्यांची कीर्तन सेवा लाभणार असून भाविकांसाठी दररोज महाप्रसाद व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.परिसरातील सर्व भाविकांनी व धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यलाभाचा लाभ घ्यावा,असे आवाहन भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.यज्ञ मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून राजस्थान येथील कारागीर हे दिड महिन्या पासून यज्ञ मंडप उभारणीचे काम करीत असून,हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या मंडपात १०८ यज्ञ कुंड तयार करण्यात आले असून त्यांना गोमूत्र, गोमय,मृतीका यांनी सारवण करुन रंगरंगोटी करण्यात येत आहे. श्रीराम कथा मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून ५ हजार भाविकांची बसण्याची व्यवस्था होईल असा वॉटर प्रूफ मंडप उभारण्यात आला असून भोजन मंडपाचे कामही अंतिम टप्प्यात असल्याची माहिती भगवान श्री कृष्ण आश्रमाचे संस्थापक भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयाची एक दिवशीय अभ्यास सहल संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

वसंत दादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने नायगाव मयूर अभ्यारण्य या ठिकाणी विज्ञान विभागाच्या एक दिवशीय सहलीचे आयोजन करण्यात आले या सहलीत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून विविध वन्यप्राणी पक्षी व जैवविविधतेबद्दल प्रत्यक्ष निरीक्षणातून माहिती घेतली. तसेच तिथे असनाऱ्या सोलार पॉवर स्टेशनला भेट देऊन कशा पद्धतीने वीज निर्मिती केली जाते त्याबद्दलची सखोल माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. सहली दरम्यान विद्यार्थ्यांना प्राण्याचे अधिवास, त्यांचे वर्तन तसेच वनस्पती व पर्यावरणाची असलेले त्यांचे नाते याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. नायगाव अभयारण्यातील कार्यरत असणारे वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रजातीबद्दल सविस्तर माहिती देत अभ्यास अधिक रंजक केला. सहलीमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांनीही या सहलीचा आनंद घेत शैक्षणिक दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली. एकूण ३२ विद्यार्थी सहलीसाठी उपस्थित होते. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. बळीराम राख उपप्राचार्य डॉ.अभय शिरसागर प्रा. नामदेव चांगण तसेच पर्यवेक्षक जोगदंड अनिल पी.जी.संचालक डॉ.गणेश पाचकोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.सहल यशस्वी करण्यासाठी प्रणिशास्त्र विभागप्रमुख डॉ.पी. बी.सिरसट, डॉ.एम. के.काळे डॉ. ऐ. एन. धारासुरकर डॉ. पी.आर. महेशमालकर, डॉ. गाढवे एम. एम. डॉ. जे. डब्ल्यू.श्रीमंगले व डॉ.आशोक नाईक यांनी परिश्रम घेतले..



## येवता ग्रामपंचायत प्रभाग रचनेत अनियमितता ; दीपक भाऊ कांबळे यांच्या नेतृत्वाखाली केज तहसीलदारांना निवेदन देत दिला आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे येवता येथे ग्रामपंचायत निवडणुकीसाठी करण्यात आलेली प्रभाग रचना नियमबाह्य आणि चुकीची असल्याचा आरोप करत,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) चे तालुकाध्यक्ष दीपक भाऊ कांबळे यांच्या नेतृत्वाखाली केजचे तहसीलदार श्री.राकेश गिड्डे यांना निवेदन देण्यात आले.या प्रभाग रचनेत तातडीने सुधारणा न झाल्यास दि.१२ मार्च पासून तहसीलकार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा रिपाई आय टी सेल ता.अध्यक्ष सुरज काळे यांच्या वतीने देण्यात आला आहे.



**प्रशासकीय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह**

दि.१ मार्च २०२६ रोजी हनुमान मंदिर येथे झालेल्या बैठकीत प्रभाग रचनेबाबत चर्चा झाली होती.मात्र,दि.६ मार्च रोजी संबंधित महसूल आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक गावात बैठक घेऊन प्रभाग रचनेची प्रक्रिया राबवली. यामध्ये दलित समाजा तील प्रतिनिधी आणि मतदारांना पूर्णपणे डावलून लोकशाहीचा गळा आवळण्याचे काम प्रशासनाने केल्याचा आरोप दीपक भाऊ कांबळे यांनी यावेळी केला.

**राजकीय दबावाखाली कार्यवाही?**

निवेदनात आरोप करण्यात आला आहे की,प्रभाग १ व २ मध्ये कोणताही बदल न करता केवळ प्रभाग ३ व ४मध्ये सोयीनुसार बदल करण्यात आले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थितीची पाहणी न करता स्थानिक राजकारण्यांच्या दबावा खाली आणि आर्थिक हेतूने ही प्रभाग रचना केल्याचा दावा निवेदना तून करण्यात आला आहे.ही रचना निवडणूक नियमांच्या विरोधात असून यामुळे दलित समाजावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

**१२ मार्चपासून आमरण उपोषणाचा इशारा**

तहसीलदार श्री.राकेश गिड्डे यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की,जर या चुकीच्या प्रभाग रचनेचा तातडीने फेरविचार झाला नाही,तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) आणि मौजे येवता येथील समस्त दलित समाज व ग्रामस्थांच्या वतीने दि. १२ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल.या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीला प्रशासन आणि महाराष्ट्र शासन जबाबदार राहील,असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.याप्रसंगी तालुकाध्यक्ष दीपक भाऊ कांबळे यांच्यासह रिपाई आयटी सेल ता.अध्यक्ष सुरज दत्तात्रय काळे, विनोद उत्तम गायकवाड, हरीश शहाजी गायकवाड,राहुल सुंदर काळे व बहुसंख्येने कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## चिंचोली माळी येथील भुमीपुत्र संकेत गलांडेचा भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल सत्कार संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील भुमीपुत्र संकेत विनायक गलांडे यांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल रविवार दि. ८ मार्च रोजी रात्री भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव व जेष्ठ नेते सुनिल आबा गलांडे पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी उपसरपंच धिरज वनवे,बाळासाहेब गलांडे पाटील,माजी उपसरपंच पवन पवार, ग्रामपंचायत सदस्य सुरज गायकवाड,दगडु दळवे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिलीप गायकवाड,राजाभाऊ नखाते,अमर नखाते, विजय घुमरे,तेजस गायकवाड,विराटदेशमुख,गफुर शेख,अभिजीत नखाते,शंकर काळे,ओम गलांडे,कृष्णा यादव, रंजीत नखाते,अशोक गलांडे,विशाल गवळी, अशोक बजगुडे, रविकुमार गायकवाड, वैभव बोर्डे,संदीप शितोळे,राहुल नखाते, इंद्रजीत गलांडे,सोनू गलांडे,दिगंबर मगर यांच्यासह ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महेश तपसे 'उत्कृष्ट युवा उद्योजक' पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रीय पत्रकार संघ,मराठी पत्रकार परिषद मुंबई व पुरोगामी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने केज तालुक्यातील चंदनसावरगाव येथील महेश शिवदास तपसे यांना 'उत्कृष्ट युवा उद्योजक' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.संघर्ष,जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यशस्वी वाटचाल करणारे युवा उद्योजक म्हणजे महेश तपसे यांची ओळख आहे.कोरोना काळात वडील कै.शिवदास कुंडलिकराव तपसे आणि बहीण कै.मिराताई शिनगारे यांचे दुःखद निधन हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण प्रसंग होता.मात्र संकटापुढे न हरता वडिलांच्या संस्काराची शिदोरी घेऊन त्यांनी चंदन सावरगाव येथे 'महेश पेट्रोलियम' ची यशस्वी स्थापना केली.गेल्या चार वर्षात २४ तास अखंड सेवा देत, १००% गुणवत्ता व मोजमापाची खात्री राखत त्यांनी ग्राहकांचा अढळ विश्वास संपादन केला आहे.महेश तपसे यांनी शेतकऱ्यांसाठी डिझेल थेट बांधावर पोहोचण्याची सुविधा देत त्यांनी सेवेला नवे रूप दिले आहे.स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकीही जपली आहे. बहिणीच्या स्मरणाथ स्थापन केलेल्या मिराई प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व विविध शैक्षणिक उपक्रम राबवून महेश तपसे समाजघडणीचे कार्य करत आहेत. अशा जिद्दी संवेदनशील आणि समाजाभिमुख युवा उद्योजकास उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्काराने महेश तपसे यांना सन्मानित करण्यात आले. महेश शिवदास तपसे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077